आरोग्य सेवा

आरोग्य सेवा संचालनालय,
पुणे कार्यालय, पुणे-४११ ००१

जा.क्र.सहसंआसे/औनि/कर्तव्य जबाबदाऱ्या/
दिनांक : १६ जानेवारी, २००७

प्रति,
उपसंचालक आरोग्य सेवा (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालये (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा क्षयरोग अधिकारी (सर्व)

विषय : औषध निर्माता या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करणेबाबत.

संदर्भ : शासकीय औषध निर्माता संघटना, पदाधिकारी यांचे सहसंचालक आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे यांचे दालनात दि. २२.११.०६ रोजी झालेली बैठक.

शासन पत्र क्र. संकीर्ण-१०२०००/३५४/प्र.क्र.१४/सेवा-६, दि. १३.४.०० अन्वये या कार्यालयाने आरोग्य सेवा संचालनालयातील औषध निर्माता या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या तपासून या कार्यालयाचे स्तरावरुन त्यास मान्यता देण्याबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. सहसंआसे/औनि/कर्तव्य-जबाबदाऱ्या/४३४५५-४५/कक्ष ५३ ब, दि. ५.११.०१ अन्वये आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत औषध निर्माता या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर कर्तव्ये व जबाबदाऱ्या या कार्यालयाचे दि. ५.११.०१ च्या पत्रान्वये सर्व उपसंचालक आरोग्य सेवा, प्रभारी मंडळे, यांना पाठवून त्याची प्रत मा. संचालक आरोग्य सेवा, मुंबई व शासनास अग्रेषित करण्यात आली आहे.

मात्र आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत असलेल्या औषध निर्माता या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पुनःश्च निश्चित करण्यात येत असून सोबत जोडण्यात येत आहेत.

सहसंचालक आरोग्य सेवा
(आरोग्य) पुणे ४११ ००१

प्रत सादर : मा. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत सविनय सादर : मा. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई २०
(लक्षवेध : श्री. अ. शि. बेळगुडी, अवर सचिव, सेवा-६)
प्रत सविनय सादर : मा. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

C:\My Documents\...doc

- औषध भांडारची किल्ली राखणे / औषध भांडारची औषध वितरण विभागाची स्वच्छता राखणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे व विभाग स्वच्छ राखून व औषधांची आवश्यक मांडणी करणे
- औषधी व साहित्य यांचे निर्लेखनाबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे
- ऑक्सिजन सिलेंडर व मानुक्त सिलिंडरांचा आवश्यकतेनुसार नियोजन करणे व साधन सामुग्री वेळीच दुरुस्त करून घेणे.
- शल्य चिकित्सक/निवासी वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय अधिक्षक यांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे पार पाडणे
- प्राथमिक आरोग्य केंद्र/ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांशी जनतेशी सौजन्याने वागावे.
- फार्मसी ॲक्टनुसार प्रशिक्षणार्थी डिप्लोमा धारकांना नियमाप्रमाणे औषधासंबंधी सर्व मार्गदर्शन करणे.
- औषधनिर्मात्यांना त्यांच्या जॉबचार्ट मध्ये समाविष्ट नसलेल्या बाह्यरुग्ण पत्रिका काढणे, आंतररुग्ण नोंदणी करणे, विविध उपचारासाठी आकारण्यात येणारे शुल्क जमा करून त्या विभागात भरणा करणे, रक्त नमुने घेणे / तपासणे आय.एस.आर. चे तापमान रजिस्टर ठेवणे, थुंकी नमुने घेणे/तपासणे इत्यादी प्रकारची अतिरिक्त कामे करण्याची सक्ती करू नये.
- औषध निर्मात्याच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमधील औषधे व साधन सामग्री बाबतचे साधनसामग्री म्हणजेच ज्यामध्ये बेड, स्टॅन्ड किंवा हेवी इक्विपमेंटचा समावेश नसून छोटी साहित्य व उपकरणे असे समजण्यात यावे.

## >> कामकाजाच्या संदर्भात आवश्यक सूचना <<

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | रक्त नमुने घेणे / तपासणे | : | बाह्यरुग्णाची आरोग्य सेविका |
| | थुंकी नमुने घेणे / तपासणे | : | किंवा लॅब असिस्टंट |
| ०२ | बाह्य रुग्ण पत्रिका | | शिपाई |
| ०३ | चलन भरणा | : | क. सहाय्यक |
| ०४. | आंतररुग्ण रजिस्टर | : | आरोग्यसेविका किंवा एल.एच.व्ही. |
| ०५. | आय.एल.आर. | | आरोग्यसेविका किंवा एल.एच.व्ही. |
| ०६. | डेडस्टॉक रजिस्टर | | क. सहाय्यक. |